प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CIDCO WE MAKE CITIES
सिडको शहरांचे शिल्पकार
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

दि. 14.01.2022

## सिडको आणि विमानतळबाधित प्रतिनिधींमधील बैठक संपन्न

उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांच्या मार्गदर्शनाखाली, सहव्यवस्थापकीय संचालक-1, सिडको यांच्या अध्यक्षतेखाली सिडको आणि नवी मुंबई विमानतळ प्रकल्पबाधितांच्या 27 गाव प्रकल्पबाधित कृती समितीच्या प्रतिनिधींसमवेत 20 जानेवारी 2022 रोजी सिडको भवन येथे बैठक पार पडली. या बैठकी दरम्यान प्रकल्पबाधितांच्या विविध प्रश्नांबाबत सकारात्मकरीत्या चर्चा पार पडली.

या प्रसंगी माजी खासदार तथा उपाध्यक्ष लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण कृती समिती, माजी खासदार, उपमहापौर, पनवेल महानगरपालिका, पोलीस उपायुक्त आणि सहाय्यक पोलीस आयुक्त, पनवेल शहर, अध्यक्ष, लोकनेत दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण कृती समिती, समितीचे अन्य पदाधिकारी, दापोली व ओवळे येथील निवडक ग्रामस्थ यांसह सिडकोतील भूमी, नियोजन, बांधकाम परवानगी आणि दूरसंचार विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

या बैठकीमध्ये 27 गाव प्रकल्पबाधित कृती समितीने मांडलेल्या नियोजित आंतरराष्ट्रीय विमानतळाचे लोकनेते दि. बा. पाटील यांच्या नावाने नामकरण, पुनर्वसन क्षेत्रातील बांधकामांना लवकरात लवकरात भोगवटा प्रमाणपत्र देणे, बांधकामधारकांना रु. 500/- प्रोत्साहन भत्ता व घरभाडे पुन्हा मंजूर करणे, मच्छिमार प्रकल्पबाधितांना अनुदान व त्यांच्यासाठी जेट्टी आणि मार्केटची व्यवस्था, खासगी मंदिरांना भूखंड व नुकसानभरपाई, विमानतळामुळे निर्माण होणाऱ्या नोकऱ्या व रोजगारांमध्ये प्रकल्पबाधितांना प्राधान्य व त्याबाबतचे प्रशिक्षण देण्याकरिता धोरण ठरविणे, पुनर्वसन क्षेत्रात क्रिकेसाठी भव्य मैदान, टाटा पॉवर लाईन व पनवेल ड्रेनेज स्कीम अंतर्गत संपादित जमिनी विमानतळ प्रकल्पासाठी वापरल्याने त्यांचा मोबदला देणे, नवी मुंबई प्रकल्पबाधितांना लवकरात लवकर 12.5% भूखंडांचे व नुकसानभरपाईचे वाटप, नवी मुंबई प्रकल्पाकरिता संपादित देवस्थान व ट्रस्टना 12.5% जमिनींचे व नुकसानभरपाईचे शीघ्र वाटप, या मुद्द्यांवर अत्यंत सकारात्मक वातावरणात चर्चा करण्यात आली.

या चर्चे दरम्यान सहव्यवस्थापकीय संचालक-1 यांनी पुनर्वसन क्षेत्रातील बांधकामांच्या उंचीवर असलेल्या निर्बंधांसंदर्भात भारतीय विमानतळ प्राधिकरणाकडे पाठपुरावा करून प्राप्त केलेल्या ब्लँकेट ना-हरकत प्रमाणपत्रामुळे या बांधकामांना बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र देणे सुलभ झाले असल्याची माहिती दिली. तसेच एकात्मिक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (युडीसीपीआर) मधील तरतुदींनुसार अनुज्ञेय असलेला चटई क्षेत्र निर्देशांक विमानतळ पुनर्वसन क्षेत्रातील बांधकामांसाठी मंजूर करण्याबाबत प्रमाणित प्रचालन प्रक्रिया (एसओपी) मंजूर करण्यात आल्याची माहितीही सहव्यवस्थापकीय संचालक-1 यांनी या वेळी दिली.

\- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,

वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धी देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**